!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४०३ २८/११/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# छावणी परिषदेच्या लोकप्रतिनिधींशी सामंजस्याने वागा : खासदार चंद्रकांत खैरे यांची छावणी परिषदेच्या सिईओंना सुचना

**संभाजीनगर (ता.२८) :** छावणी परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन त्यावरील सिईओंना कारवाई, टोलनाक्यांचे नुकसान आणि सिईओंना निवासस्थानाची दुरुस्ती यावरुन छावणी परिषदेची सर्व साधारण सभा आज वादळी ठरली. छावणीच्या सिईओ पुजा पालेचा यांच्या तडकाफडकी कारवाई आणि लोकप्रतिनिधींशी असलेल्या वागणुकी वरुन सर्वसाधारण सभेत वादळी चर्चा झाली. सिईओ, लोकप्रतिनिधी कर्मचारी यांनी सामंजस्याने काम केले नाही तर परिषदेचा विकास खुंटेल त्याचा परिणाम नागरिकांच्या सोयी सुविधांवर होईल त्यासाठी सिईओंनी लोकप्रतिनिधीशी सामंजस्याने वागण्याच्या सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकित दिल्या.

छावणी परिषदेतील कोणत्याच कामाच्या वर्क ऑर्डर सिईओ देत नाही शिवाय सिईओ पुजा पालेचा यांच्या निवासस्थांचे दुरुस्ती कॉन्टोंनमेंट बोर्डाची परवानगी न घेता काम पूर्ण झाल्यानंतर सभेत मांडण्यात आला. त्याला सर्व सदस्यांनी आक्षेप नोंदवला. १२ दिवस छावणी परिषदेचा टोल नाका बंद राहिल्याने ३५ लाख रुपयांचे छावणीचे नुकसान झाले त्याची भरपाई सिईओंकडून करण्यात यावी अशी मागणी छावणीचे उपाध्यक्ष किशोर कच्छवाह यांनी केली तर वृत्तपत्रातुन सदस्यांच्या अधिकारासंदर्भात चुकीच्या प्रतिक्रिया सिईओ देत असल्याने सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.

पंचवटी चौक ते नगरनाका पर्यंत कोणत्याही वाहनांना मज्जाव करत या परिसरात उभा राहणाऱ्या वाहनांना १०० रुपये दंड करण्याचे आदेश छावणी परिषदेचे अध्यक्ष बिग्रेडीयर मनोजकुमार यांनी दिले. छावणी परिषदेचे कर्मचारी, लोकप्रतिनिधी, सीईओ यांनी सामंजस्याने एकत्रित काम केले तरच कारभार सुरळीत चालेल त्यासाठी सर्वांनीच आपली जबाबदारी ओळखून छावणी परिषदेशी प्रामाणिक राहुन काम करण्याचे आवाहन ही यांनी केले तर कामबंद आंदोलनामुळे छावणीच्या बजेट अहवालावर परिणाम झाला असुन यापुढे कोणतेही कर्मचाऱ्याचे निष्काळाजीपणाचे काम खपवून घेतले जाणार नाही असा सज्जड दम बिग्रेडीयर मनोजकुमार यांनी दिला. विकास कामांना गती देण्यासाठी सिईओंनी छावणीचे लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांशी सामंजस्याने वागून छावणीच्या विकासकामांना गती देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावे व नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यातुन मुक्त करण्यासाठी प्रयत्नशिल राहावे अशा सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केल्या. बैठकिच्या अध्यक्षस्थांनी बिग्रेडीयर मनोजकुमार, उपाध्यक्ष किशोर कच्छवाह, सिईओ पुजा पालेचा, कर्नल महाडिक, कर्नल रेड्डी, नगरसेवक संजय गारोल, प्रशांत तारगे, पद्मश्री जैस्वाल, शेख हनिफ, मिर्झा रसद बेग, प्रतिभा काकत सुधीर भाले, शिवाजी बनकर आदिंची उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525